# Kiosk Machines Comprehensive - AMC

## दुरूस्ती व देखभाल करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व त्यांचे अधिपत्याखाली असणारी सर्व तालुका न्यायालयांमध्ये वापरात असलेल्या १७ **Kiosk Machines** मशीनचा स्थानिक पातळीवर (**Comprehensive - AMC with all components)** दुरूस्ती व देखभाल वार्षिक करार करणेसाठी मोहोरबंद दरपत्रक (निविदा) मागविणेत येत आहेत. तरी इच्छूक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाले पासून आठ दिवसांचे आत **Kiosk** मशीनची पाहणी व माहिती घेणेकरिता मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील संगणक विभाग येथे प्रत्यक्ष भेट देऊन सदरची निविदा भरणेची आहे. नोंदणीकृत व इच्छूक सेवाधारकांकडून सदरची जाहीरात प्रसिध्द झालेपासून दिनांक **०९/०४/२०२६** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा सादर करावयाच्या आहेत. याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी. ज्यांना निवीदा भरणेचे आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दिनांक **०९/०४/२०२६** रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहोचतील अशा रितीने निविदा सादर कराव्यात. **या सोबत Kiosk Machines बाबत माहितीसाठी Annexure-I व दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी सोबत जोडलेले आहेत.**

हुकूमावरून,

सहा.अधिक्षक (वित्त),
जिल्हा व सत्र न्यायालय,कोल्हापूर.

दिनांक - ०१/०४/२०२६

# Annexure-I

| Sr. No. | Name of Court Complex | Make and Model | Qty | Per Unit Price | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1. | District Court, Kolhapur | **Dell E2218 HN Touch Screen : PCAP 22"**<br><br>Inifinitas i-300 Pedestal Model Bajaj or Tata Steel<br><br>Processor i-3-7100, RAM 4GB, 500 GB HDD, HDMI with UPS Power YPB 600 VA, AC Adapter: M inter : 12V – 1A - USB | 2 | 98,889.90 | 1,97,779.80 |
| 2. | District Court – 1, Ichalkaranji | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 3. | District Court – 1, Gadhinglaj | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 4. | District Court – 1, Jaysingpur | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 5. | Civil and Criminal Court, Kagal | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 6. | Civil and Criminal Court, Ajara | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 7. | Civil and Criminal Court, Chandgad | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 8. | Civil and Criminal Court, Gadhinglaj | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 9. | Civil and Criminal Court, Gargoti | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 10. | Civil and Criminal Court, Jaysingpur | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 11. | Civil and Criminal Court, Kurundwad | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 12. | Civil and Criminal Court, Panhala | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 13. | Civil and Criminal Court, Vadgaon | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 14. | Civil and Criminal Court, Shahuwadi | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 15. | Civil and Criminal Court, Kale-Kheriwade | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| 16. | Civil and Criminal Court, Radhanagari | | 1 | 98,889.90 | 98,889.90 |
| | | | **17** | -- | **16,81,128.30** |

# दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| ०१. | मोहरबंद निविदा हे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कोल्हापूर या नावाने दिनांक ०९/०४/२०२६ इ. रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून किंवा त्यापूर्वी या कार्यालयास पोहोचतील अशा बेताने सादर कराव्यात त्यानंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. |
| ०२. | सदरहू दरपत्रक सुचनेतील नमूद सर्व्हरसाठी कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांना राखून ठेवले आहेत. |
| ०३. | कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर यांनी स्वत:कडे ठेवला आहे. |
| ०४. | Kiosk मशीन्सची वार्षिक देखभाल/दुरूस्ती करार हे जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व त्यांचे अधिपत्त्याखाली असणारे जिल्हा न्यायालये, दिवाणी न्यायालये वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालये कनिष्ठ स्तर, या तालुका न्यायालयांकरीता राहील. |
| ०५. | मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दूरध्वनीव्दारे Kiosk Machines दुरूस्ती संदर्भात तक्रार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. |
| ०६. | तालुक्या न्यायालयातील Kiosk Machines दुरूस्तकरते वेळी सुटे भाग दुरूस्तीकरीता नेल्यास दोन दिवसाचे आत सदरहू सुटे भाग दुरूस्त करून जोडणे बंधनकारक राहील. |
| ०७. | निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांना राहतील. |
| ०८. | वरील नमूद न्यायालयातील Kiosk Machines हे Linux/Ubantu Operating System/Case Information System यासाठी वापरली जातात याची नोंद घ्यावी. |
| ०९. | दरपत्रक मंजूर झाल्यावर संबंधितास रक्कम रु. ५००/- रूपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करून द्यावा लागेल व सदरहू रक्कम रु. ५००/- रूपयाचे बॉन्डपेपरचा खर्च संबंधितास सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासून एका वर्षाचा राहील. |
| १०. | वार्षिक देखभाल/दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की,(G.S.T Income Tax, etc) दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधितांस/व्यवसायिकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील. या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधितांस अदा करणेत येणार नाहीत. |

| | |
|---|---|
| ११. | Kiosk Machines(Comprehensive) देखभाल/दुरूस्ती करार असल्यामुळे त्यांची विविध सुटे पार्ट करणे व दुरूस्त न झाल्यास बदलून देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही. |
| १२. | देयक हे त्रैमासिक पध्दतीने सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| १३. | देयक हे संपूर्ण तपशिलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल. |
| १४. | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करण्यात येईल. |
| १५. | एखाद्या निविदाधारकाविरुध्द खरेदी प्रक्रियेसंदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निविदा भरु नये, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कारवाई केली जाईल. |
| १६. | पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारचे साहित्याची मागणीची निविदा प्रसिध्द केलेली आहे त्याच प्रकारच्या साहित्याची निविदा भरणेची आहे. अन्य निविदेचा विचार केला जाणार नाही. |

**<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>**

१) संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते की, सदरील निविदा जिल्हा न्यायालय, कोल्हापूरचे (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशित करणेत यावी.

२) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर नोटीस बोर्ड.